**'परिशिष्ट – ब'**

(शासन निर्णय क्र. इबीसी २०१७/प्र.क्र.५२४/ शिक्षण – १, दिनांक २९ जानेवारी,२०१८ चे सहपत्र)

## सन 2025 - 2026 या शैक्षणिक वर्षाकरिता शिष्यवृत्ती

## (ब) विद्यार्थी व पालकांनी द्यावयाचे बंधपत्र ( Indemnity Bond)

मी / आम्ही खाली सही करणार / करणारे प्रतिज्ञापन करतो की, शिष्यवृत्ती मिळण्याबाबत शासनाने विहित केलेल्या कालमर्यादेत शिष्यवृत्ती मिळण्याबाबतचा अर्ज महाविद्यालाच्याा कार्यालयात जमा करू.

१) मी/आम्ही खाली सही करणार /करणारे प्रतिज्ञापन करतो की ,शिष्यवृत्ती मिळण्याबाबत शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्ती मला /आम्हाला मान्य आहेत. अर्जात वरीलप्रमाणे नमूद केलेली सर्व माहिती पूर्णपणे सत्य आहे. सदरची माहिती खोटी अथवा अपुरी आढळल्यास भारतीय दंडविधानाप्रमाणे होणाऱ्या दंडास/ शिक्षेस मी/ आम्ही पात्र आहे/ आहोत अर्जात नमूद केलेल्या माहितीपैकी कोणतीही माहिती वा निवेदन चुकीचे आढळून आल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला निर्णय अंतिम असेल व तो माझ्यावर / आम्हावर बंधनकारक असेल, अशी मी/ आम्ही हमी देतो. जर शिष्यवृत्तीची , शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम अनुज्ञेय रक्कमेपेक्षा अधिक मिळाली तर मी/आम्ही शासनास जमा करू, अशी जास्तीची अथवा अन्य कारणामुळे वसूल करण्यास येणारी रक्कम मी / आम्ही पूर्णपणे शासनास परत करण्याची हमी देतो.

२) माझ्या कुटुंबाच्या उत्पन्नाची व जातीची अर्जात नमूद केलेली माहिती खोटी आढळल्यास माझ्या/ माझ्या पाल्याच्या विरूध्द होणाऱ्या कारवाईस मी/ आम्ही स्वतः जबाबदार राहू.

३) मी अर्जासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे, मी सक्षम अधिकाऱ्याकडून / प्राधिकाऱ्याकडून प्राप्त केलेली असून, ती कागदपत्रे खरी असून योग्य मार्गाने मिळविलेली आहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा फेरफार/ दुरूस्ती/ बदल केलेला नाही. सदरील कागदपत्रे, प्रमाणपत्रे खोटी अथवा नकली नाहीत हे मी सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो. अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे , प्रमाणपत्रे खोटे अथवा बनावट आढळल्यास त्यास मी/ आम्ही पुर्णतः जबाबदार असून त्यासाठी भारतीय दंड विधान कायदा कलम १९९ व २०० नूसार लागू होणाऱ्या शिक्षेस मी/ आम्ही पात्र राहू, याची मला/ आम्हाला पुर्ण जाणीव आहे.

४) सन २०२३ - २४ या वर्षाची शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काची रक्कम माझ्या आधार संलग्न बॅक खात्यावर जमा होताच, त्यापैकी महाविद्यालयास देय असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम सात दिवसात महाविद्यालयात जमा करून त्याची रितसर पावती करून घेण्याची माझी/ आमची जबाबदारी असेल. शुल्क महाविद्यालयात जमा न केल्याने भविष्यात उदभवणाऱ्या या परिणामास मी/ आम्ही वैयक्तीक जबाबदार असू असे प्रतिज्ञापूर्वक हमीपत्र / बंधप्रत्र मी / आम्ही सादर करीत आहोत

ठिकाण :

दिनांक :

**(अर्जदाराच्या वडीलांची / पालकांची सही व पुर्ण नाव)** **(अर्जदाराची सही व पुर्ण नाव )**

# मुंबई विद्यापीठ

क. डिबीटी_सेल/आयसीडी/२०२१-२२/८
मुंबई - ४०० ०९८.
२० ऑगस्ट, २०२२.

## हमीपत्र

**शासन निर्णय क्र. भासशि-२०२२/प्र.क्र. ७४/शिक्षण-१, दि. १७ मार्च, २०२२**

मी, (विद्यार्थ्याचे नाव) ------------------------------------------ (विभागाचे नाव) ---------------------------------------------------- या विभागामध्ये (विषय) ------------------------ या अभ्यासक्रमाचा विद्यार्थी असून शैक्षणिक वर्ष -------------- या कालावधीमध्ये मी, महाडिबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती/DBT (Direct Benefit Transfer) साठी अर्ज केला असून मला अनुज्ञेय असलेल्या शैक्षणिक शुल्कापैकी केंद्र शासनाच्यावतीने ६०% च्या हिस्स्याचे वितरण महाडिबीटी प्रणालीवर माझ्या आधार संलग्नीकृत बँक खात्यामध्ये थेट केंद्र शासनामार्फत DBT (Direct Benefit Transfer) तत्वावर वितरीत करण्यात येणार आहे. त्यामुळे मी शिक्षण घेत असलेल्या शैक्षणिक संस्था/महाविद्यालय/विद्यापीठास देय असणा-या शुल्काचा भाग (शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, व इतर नापरतावा शुल्क इत्यादी) सदर ६०% रक्कम केंद्र शासनाकडून माझ्या खात्यामध्ये जमा झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांत मी, संस्था/महाविद्यालय/विद्यापीठास अदा करेन.

मी, अनुसचित जाती(SC) / अनुसचित जमाती(ST) /इतर मागास प्रवर्ग (OBC) / आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) या प्रवर्गामध्ये मोडत असून मी शिक्षण घेत असलेल्या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या शैक्षणिक शुल्क/फी मध्ये सवलत मिळण्यासाठी शिष्यवृत्ती/DBT (Direct Benefit Transfer) चा अर्ज mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर निर्देशित केल्यानुसार करणे बंधनकारक असल्याबाबतचे मला मी शिक्षण घेत असलेल्या शैक्षणिक संस्था/महाविद्यालय/विद्यापीठाने अवगत केले आहे. शैक्षणिक शुल्क/फी मध्ये सवलत मिळण्यासाठी शिष्यवृत्ती/DBT (Direct Benefit Transfer) चा अर्ज जर मी mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर भरला नाही किंवा अर्ज परिपूर्ण नाही म्हणून शासनाने/संस्था/महाविद्यालय/विद्यापीठाने माझेकडे परत पाठविला किंवा शासनाच्या संबंधिक विभागाकडून रद्द (Reject) केला तर मला सर्वसाधारण प्रवर्गासाठी (General Category) आकारण्यात येणारे पूर्ण शुल्क भरावे लागेल असे अवगत करण्यात आले आहे आणि ते मला मान्य आहे. संबंधित विद्यापीठ परिपत्रक क.वि.क./भा.स.शि.(२४)/३६०/२००४ मी वाचले आहे.

(विद्यार्थ्याचे नाव व सही)

(शिष्यवृत्ती लिपीक)
सही

(विभागप्रमुख)
सही व शिक्का

दिनांक :

स्थळ :